PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Janmthep
Year: 1993

Song: Shravnatalya Tya Ratrichi
Lyricist: Ga. Di. Madgulkar

श्रावणातल्या त्या रात्रीची
शपथ घालिते तुला
नकोस टाकून जाऊ जिवलगा
अशी एकटी मला
रे अशी एकटी मला
रे श्रावणातल्या त्या रात्रीची
शपथ घालिते तुला

त्या रात्रीची उब लोकरी
ओलावा चंदनी
ओलावा चंदनी
खिडकीमधूनी पाहू लागली
न्हालेली चांदणी
ती न्हालेली चांदणी
बोल लावूनी ती लाजूनी मी
जर पडदा ओढीला
बोल लावूनी ती लाजूनी मी
जर पडदा ओढीला
रे श्रावणातल्या त्या रात्रीची
शपथ घालिते तुला

दमट चांदणे पुसट उमटले
होते पडद्यावरी
होते पडद्यावरी
हळूच टेकीले ओठ सख्या तू
बुरखा मी सावरी
बुरखा मी सावरी
बंद कवाडा आड तुझ्या मी
उरी माथा टेकीला रे
बंद कवाडा आड तुझ्या मी
उरी माथा टेकीला रे
श्रावणातल्या त्या रात्रीची
शपथ घालिते तुला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*